# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## ट्रेनिंग व प्लेसमेंट सेल
## अहवाल 2024 - 25

1. प्लेसमेंट सेलमार्फत प्रस्तुत विद्यापीठातील विद्यार्थ्यांकरीता दि.21/08/2024 रोजी OJTबाबतची कार्यशाळा घेण्यात आली होती. सदर कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांना On Job Trainingबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

२. संलग्नित महाविद्यालयांमध्ये पदवी व पदव्युत्तर वर्गाच्या अंतिम वर्षांत शिक्षण घेणा-या मुलींकरीता Mahindra Pride Classroom अंतर्गत नांदी फांऊडेशन आणि पु. अ. हो. सो. वि. सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने मुलींकरीता एक आठवडयाचे “The Empoyability Skill Development Program” या प्रशिक्षण शिबिराचे मोफत आयोजन डिसेंबर 2024मध्ये करण्यात आले होते. या प्रशिक्षण शिबिरातंर्गत विद्यार्थीनीमध्ये व्यक्तीमत्व विकास, रोजगार कौशल्य, मुलाखतीचे तंत्र, सी. व्ही. तयार करणे इ. बाबींचा फायदा झालेला आहे.



नांदी फांऊडेशन तर्फे मुलींकरीता एक आठवडयाचे प्रशिक्षण शिबिर

३. प्लेसमेंट सेलमार्फत प्रस्तुत विद्यापीठातील विद्यार्थ्यांकरीता बँकिग आणि वित्त कौशल्य अकादमी संस्था यांचा कॅम्पस ड्राइव्ह **दि. २६ सप्टेंबर २०२४** रोजी आयोजित करण्यात आला होता. सदर कॅम्पस ड्राइव्हमध्ये विद्यार्थ्यांना ॲक्सिस बँक (विक्री अधिकारी/बीडीई) मध्ये अंजे २५० पदांकरीता नोकरीच्या संधी उपलब्ध होत्या.



ॲक्सिस बँक कॅम्पस ड्राइव्ह दि. २६ सप्टेंबर २०२४

4. दि. ०४/०२/२०२५ रोजी Upthink Edutech Services Pvt. Ltd. यांच्यामार्फत Junior Associates या पदाकरिता ऑनलाईन कॅम्पस ड्राइव्ह आयोजित करण्यात आला होता.

५. दि. ०८/०२/२०२५ रोजी Niva Bupa Health Insurance Company यांच्यामार्फत Unit Manager Assistant व Unit Manager या पदाकरिता कॅम्पस ड्राइव्ह प्रस्तुत विद्यापीठात आयोजित करण्यात आला होता. सदर कॅम्पस ड्राइव्हमध्ये ७४ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज दाखल केले होते. मुलाखतीसाठी ६ विद्यार्थी पात्र ठरले होते.






**Niva Bupa Health Insurance Company Campus Drive**

६. राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP) २०२० च्या उद्दिष्टांशी सुसंगत राहण्यासाठी पु. अ. हो. सो. वि. सोलापूर व महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स यांच्यातील सामंजस्य कराराचा एक भाग म्हणून **दि. ०१/०३/२०२५** रोजी सकाळी १०:३० ते दुपारी ०४:३० वाजेपर्यंत सोलापूर विद्यापीठ सभागृहात " Faculty Capacity Building Program and Industry - Institute Interaction " या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

७. महाराष्ट्र शासनाच्या MFV प्रकल्पासाठी CMS Computer तर्फे 1. Assistant Chemical Analyzer 2. Scientific Assistant (Cyber and TASI) या पदासाठी **दि. २७/०५/२०२५** रोजी कॅम्पस ड्राइव्हचे आयोजन प्रस्तुत विद्यापीठाच्या मुख्य सभागृहात करण्यात आले होते. सदर पदासाठी प्रत्येकी ५०० पदाची Vacancy होती.









**MFV प्रकल्पासाठी CMS Computer तर्फे कॅम्पस ड्राइव्ह**

8. Axis बँकेच्या यशस्वी कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्हनंतर पु. अ. हो. सो. विद्यापीठात IBF Skills Academy च्या सहकार्याने HDFC या बँकेत पदवीधर व पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी Sales Officer या पदासाठी दि. ०२/०६/२०२५ रोजी कॅम्पस ड्राइव्हचे आयोजन करण्यात आले होते.




**IBF Skills Academy च्या सहकार्याने HDFC Bank Sales Officer या पदासाठी कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्ह**

9. पु. अ. हो. सो. विद्यापीठात Narayana e-Techno School, Solapur तर्फे प्रस्तुत विद्यापीठातील पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी दि. ०५/०६/२०२५ रोजी कॅम्पस ड्राइव्हचे आयोजन करण्यात आले होते.

10. TCS, पुणे कंपनीमार्फत M.C.A. & M.Sc. च्या विद्यार्थ्यांसाठी नोकरीची संधी उपलब्ध करुन देण्यासाठी कॅम्पस ड्राइव्ह आयोजित करण्यात आला होता. सदर कॅम्पस ड्राइव्हकरिता विद्यार्थ्यांना दि. २३/०३/२०२५ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने नोंदणी करण्याबाबत कळविण्यात आले होते. सदर कॅम्पस ड्राइव्हद्वारे विद्यार्थ्यांची यादी TCS, पुणे कंपनीला कळविण्यात आली होती.

११. प्रस्तुत विद्यापीठातील ट्रेनिंग व प्लेसमेंट सेल आणि कलर्स सोसायटी यांच्यामध्ये दि.३०/११/२०२४ रोजी सामंजस्य करार करण्यात आलेला आहे. सदर सामंजस्य करारामुळे विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयामध्ये शिक्षण घेत असलेले विद्यार्थी, शिक्षक, शास्त्रज्ञ यांचे

आदानप्रदान तसेच एकत्रित संशोधन प्रकल्प सादर करणे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कार्यशाळा, परिसंवाद, चर्चासत्रे इत्यादींचा समावेश आहे.




**ट्रेनिंग व प्लेसमेंट सेल आणि कलर्स सोसायटी यांच्यामध्ये दि.३०/११/२०२४ रोजी सामंजस्य करार**

१२. प्रस्तुत विद्यापीठातील ट्रेनिंग व प्लेसमेंट सेल आणि सीएसआयआर - राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा, डॉ. होमी भाभा मार्ग, पुणे यांच्यामध्ये दि.३०/१०/२०२४ रोजी सामंजस्य करार करण्यात आलेला आहे. सदर सामंजस्य करारामुळे विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयामध्ये शिक्षण घेत असलेले विद्यार्थी, शिक्षक, शास्त्रज्ञ यांचे आदानप्रदान तसेच एकत्रित संशोधन प्रकल्प सादर करणे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कार्यशाळा, परिसंवाद, चर्चासत्रे इत्यादींचे संयुक्त विद्यमाने आयोजन करणे. OJT/आंतरवासिता करिता विद्यार्थ्यांना पाठविणे इत्यादी गोष्टींचा यामध्ये समावेश आहे.



**ट्रेनिंग व प्लेसमेंट सेल आणि सीएसआयआर - राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा यांच्यामधील सामंजस्य करार**

१३. प्रस्तुत विद्यापीठातील ट्रेनिंग व प्लेसमेंट सेल आणि Board of Apperenticeship Training (Western Region), Mumbai यांच्यामध्ये दि.२४/१२/२०२४ रोजी सामंजस्य करार करण्यात आलेला आहे. सदर सामंजस्य करारातंर्गत बोर्ड आणि विद्यापीठ/उच्च शैक्षणिक संस्था यांच्यात संबंध आणि सहकार्य स्थापित करणे जेणेकरुन अंतिम वर्षाच्या पदवी आणि पदविका कार्यक्रमाचा औद्योगिक प्रशिक्षण घटक NATS अंतर्गत येईल.




ट्रेनिंग व प्लेसमेंट सेल आणि **Board of Apperenticeship Training** सामंजस्य करार

१४. प्रस्तुत विद्यापीठातील ट्रेनिंग व प्लेसमेंट सेल आणि BRAINY N BRIGHT EDUTECH PRIVATE LTD. यांच्यामध्ये दि.१७/०२/२०२५ रोजी सामंजस्य करार करण्यात आलेला आहे. सदर सामंजस्य करारातंर्गत विद्यापीठात शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांकरीता आंतरवासिता (Internship), On Job Training (OJT) यांसंबंधित फायदेशीर होईल.

१५. प्रस्तुत विद्यापीठातील ट्रेनिंग व प्लेसमेंट सेल आणि Bajaj Finserv Limited and Bajaj Finance Limited यांच्यामध्ये दि.२७/०५/२०२५ रोजी सामंजस्य करार करण्यात आलेला आहे. सदर सामंजस्य करारातंर्गत विद्यापीठ संकुलातील व संलंग्नित महाविद्यालयामध्ये M.B.A., M.Com., M.A. Economics या विषयांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना मोफत प्रशिक्षण देणे. तसेच लहान शहरे व ग्रामीण भागातील पदवीधरांना सक्षम बनविणे व सेवा उदयोगातील करिअरसाठी योग्य बनविणे. संवाद कौशल्य विकसित करणे आणि रिटेल बँकिंग, NBFC, जीवन विमा आणि सामान्य विमामधील उत्पादने आणि प्रक्रियांबद्दल व्यवहारिक ज्ञान मिळविणे विद्यार्थ्यांना सोयिस्कर होईल.




ट्रेनिंग व प्लेसमेंट सेल आणि **Bajaj Finserv Limited and Bajaj Finance Limited** सामंजस्य करार

१६. प्रस्तुत विद्यापीठातील ट्रेनिंग व प्लेसमेंट सेल आणि Maharashtra Chamber of Commerce यांच्यामध्ये दि. 25/07/2024 रोजी सामंजस्य करार करण्यात आलेला आहे. सदर सामंजस्य करारातंर्गत OJT/आंतरवासिता करिता विद्यार्थ्यांना पाठविणे इत्यादी गोष्टींचा यामध्ये समावेश आहे.




पु.अ.हो.सो.वि.सोलापूर व महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स यांच्यामधील सामंजस्य करार

(डॉ. व्ही.डी. कड्डू)
समन्वयक,
प्रशिक्षण आणि प्लेसमेंट सेल,
पु. अ. हो. सोलापूर विद्यापीठ, सोलापूर